जैवसंरक्षणाविषयी कायद्यांची थोडक्यात माहिती

# वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ (२००३ आणि २००६ च्या सुधारणा कायद्यांसहित)

KALPAVRIKSH

कल्पवृक्ष

कल्पवृक्ष एन्व्हायरन्मेंट अ‍ॅक्शन ग्रुप

# वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ (२००३ आणि २००६ च्या सुधारणा कायद्यांसहित)[१]



हा कायदा भारतातील जीवसृष्टी व पर्यावरण सुरक्षेच्या दृष्टीकोनातून, वन्यप्राणी, पक्षी तसेच त्यांच्याशी संलग्न सर्व घटकांना संरक्षण पुरवतो.

## १. या कायद्यात काय समाविष्ट आहे?

या कायद्यात जम्मू व काश्मिर वगळता संपूर्ण भारतातील वनजीवनाचा समावेश होतो. 'वनजीवन' या संज्ञेत कोणतेही प्राणी, जलचर तसेच भू-वनस्पती जे कोणत्याही अधिवासाचा हिस्सा आहेत ते समाविष्ट आहेत.

## २. या कायद्याखाली कोणती अधिकारमंडळे बनवली गेली आहेत?

केंद्रशासन पातळीवर

- वन्यजीव संगोपन मुख्याधिकारी व अन्य अधिकारी (कलम 3).
- राष्ट्रीय वन्यजीव मंडळ ज्यामध्ये पंतप्रधान अध्यक्षस्थानी असून मंडळाची मुख्य कार्ये पुढीलप्रमाणे आहेत (कलम 5A, 5C).
  - वन्यजीव संवर्धनाच्या कार्यात सुधारणा येण्यासाठी उपाययोजना करणे. - केंद्र आणि राज्यशासनाला वन्यजीव संवर्धनाला चालना देण्यासाठी आणि वन्यजीवांची अवैध शिकार तसेच वनोपजाचा बेकायदेशीर व्यापार नियंत्रित ठेवण्यासाठी सल्ला देणे व धोरणांची आखणी करणे.
  - वन्यजीव संवर्धनातील सुधारणेसाठी उपाययोजना सुचविणे.
  - वन्यजीवनावर भाष्य करणारा अहवाल किमान २ वर्षांतून एकदा तयार करून प्रकाशित करणे.
- राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण अधिकार मंडळ (पहा पुढील क्र. ९)

---

१ दिव्या राधाकृष्णन व ध्रुव सिंह, सिमबाएसिस सोसाइटी के लॉ कालेज (पुणे) के विद्यार्थियों, द्वारा कल्पवृक्ष के लिए, आशीष कोठारी व नीमा पाठक के मार्गदर्शन में तैयार किया गया। संपादकीय सहयोग तेजस्वनी आप्टे व एरिका तारापोरवाला ने दिया। यह वैधानिक टिप्पणियां प्रत्येक कानून के मुख्य प्रावधानों को आसान शब्दों में उपलब्ध कराने के लिए हैं इसलिए इनमें कानूनों का विश्लेशण शामिल नहीं है।

- व्याघ्र व अन्य संकटग्रस्त वन्यजीव गुन्हे प्रतिबंध खाते (कलम 38 Y व Z).

ज्याची कार्ये पुढीलप्रमाणे -

- संघटित वन्यजीव गुन्हेगारी कारवायांबाबतची माहिती जमा करणे व त्याविरुद्धच्या कार्यवाहीसाठी जबाबदार अन्य विभागांना ती पुरवणे.
- राज्य सरकारे, विविध अधिकारी तसेच अधिकारमंडळांच्या कार्यात सुसूत्रता आणणे.
- आंतरराष्ट्रीय करार, जे भारतास लागू आहेत, त्यांची अंमलबजावणी करणे.

**राज्यपातळीवर**

- मुख्य वन्यजीव अधिकारी (चीफ वाईल्डलाईफ वार्डन, सी.डब्ल्यू.एल.डब्ल्यू.), वन्यजीव अधिकारी, मानद वन्यजीव अधिकारी व अन्य अधिकारी (कलम 4).
- राज्य वन्यजीव मंडळ, ज्यामध्ये मुख्यमंत्री अध्यक्षस्थानी असून, मंडळाची मुख्य कार्ये पुढीलप्रमाणे आहेत (कलम 6 व 8) :
  - संरक्षित क्षेत्रांची निवड व व्यवस्थापन.
  - परवानगी व परवाने मंजुरीसाठीचे धोरण आखणे.
  - आदिवासी तसेच वनात राहणाऱ्या अन्य समुदायांच्या गरजा आणि वन्यजीवांचे संवर्धन व संरक्षण यांची सांगड घालण्यासाठीच्या उपाययोजनांच्या आखणीत सल्ला देणे.
- व्याघ्र सुकाणू समिती आणि व्याघ्र संवर्धन संस्था (पहा पुढील क्र. ९)

## ३. वन्यजीवांच्या शिकारीसंदर्भात कोणत्या तरतूदी आहेत?

वन्यजीवांच्या अनेक प्रजाती कायद्यासोबतच्या पाच परिशिष्टांमध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. परिशिष्ट १ ते ४ मध्ये नोंदवलेल्या कोणत्याही प्राण्याच्या शिकारीसाठी परवानगी नाकारण्यात आलेली आहे तसेच परिशिष्ट १ व परिशिष्ट २ च्या भाग २ मध्ये नोंदण्यात आलेल्या प्राण्यांच्या (जे विशेष संकटग्रस्त आहेत) व्यापाराविरुद्ध अधिक कडक बंधने व दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात आलेली आहे. परिशिष्ट पाचमध्ये 'उपद्रवकारक' प्राण्यांची नोंद असून त्यांच्या शिकारीसाठी सशर्त परवानगी देण्यात आली आहे.

परिशिष्ट १, २, ३ व ४ मध्ये नोंदवलेल्या प्राण्याच्या शिकारीपूर्वी तो प्राणी मनुष्याच्या जीवाला धोकादायक झाला आहे वा सुधारणा न होण्याइतका अपंग किंवा आजारी आहे अशी खात्री मुख्य वन्यजीव अधिकाऱ्याला झालेली असली पाहिजे (कलम 9 व 11).



'शिकार' यामध्ये पुढील गोष्टी अंतर्भूत आहेत [कलम 2(16)].

(अ) जंगली व पकडलेल्या प्राण्यावर विषप्रयोग करणे व त्याला मारणे वा यापैकी काहीही करण्याचा प्रयत्न करणे.

(ब) कोणताही वन्यप्राणी पकडणे, पारध करणे, जाळ्यात पकडणे, सापळ्यात अडकवणे, हाकणे वा छळ करणे वा यापैकी काहीही करण्याचा प्रयत्न करणे.

(क) वन्यप्राण्याच्या शरीराचा कोणताही भाग जखमी करणे, जायबंदी करणे, काढून घेणे किंवा वन्य पक्षी व सरपटणाऱ्या प्राण्यांची अंडी खराब करणे वा त्यांच्या घरट्यांची नासधूस करणे.

हा कायदा निकोबार बेटावरील अनुसूचित जमातींच्या शिकारीच्या अधिकारांवर बंधने आणत नाही (कलम 65).

## ४. वन्य वनस्पतींच्या संरक्षणासाठी या कायद्यात काही तरतूदी आहेत काय?

हा कायदा 'विशिष्ट प्रकारच्या' वन्य वनस्पतींच्या संरक्षणासाठीच्या तरतूदी पुरवतो (परिशिष्ट ६ मध्ये नमूद केलेल्या). केंद्र सरकारने नमूद केलेल्या कोणत्याही वनजमिनीवरून वा विभागातून नमूद केलेल्या वनस्पती कोणीही व्यक्ती स्वत:च्या इच्छेनुसार तोडू, उपटू वा गोळा करू शकत नाही तसेच त्या वनस्पतीला कोणतीही इजा करू शकत नाही (कलम 17 A) परंतु शैक्षणिक वा शास्त्रीय कामासाठी मुख्य वन्यजीव अधिकाऱ्याच्या परवानगीनंतर एखादी व्यक्ती तसे करू शकते (कलम 17 B).

कोणत्याही नमूद केलेल्या वनस्पतीची - जिवंत वा मृत - कोणीही विक्री, वाहतूक वा बदली वा ताबेदारी करू शकत नाही. मात्र अनुसूचित जमातीचा सदस्य तो राहत असलेल्या जिल्ह्यातील वनस्पती गोळा करू शकतो वा बाळगू शकतो (स्वत:च्या खात्रीशीररित्या वैयक्तिक उपयोगासाठी) (कलम 17 A).

कोणीही व्यक्ती परवाना असल्याशिवाय नमूद केलेल्या वनस्पतीची लागवड वा व्यापार करू शकत नाही (कलम 17 C व D).

## ५. संरक्षित क्षेत्रे व त्यातील अधिकार यासाठीच्या काय तरतूदी आहेत?

कायद्याने पाच प्रकारची संरक्षित क्षेत्रे नमूद केलेली आहेत, त्यापैकी चार क्षेत्रांविषयीचे

विवरण इथे दिले असून पाचवे क्षेत्र, व्याघ्र संरक्षित क्षेत्र ९ व्या विभागात स्पष्ट केले आहे. विविध संरक्षित क्षेत्रांसाठीच्या तरतुदींची तुलना तक्ता क्र. १ मध्ये दिलेली आहे. येथे नमूद केलेल्या तरतूदी राज्य शासनाच्या अधिकारांमधील आहेत मात्र केंद्रशासनदेखील अभयारण्ये वा राष्ट्रीय वने घोषित करू शकते (हा अधिकार आजतागायत वापरला गेलेला नाही.)

**अभयारण्ये**

राज्यशासन सूचना जारी करून कोणताही भाग वन्यजीव संलग्न पर्यावरणाच्या संरक्षणासाठी अभयारण्य बनवणार असल्याचे घोषित करू शकते (कलम 18). अशी सूचना जारी केल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रस्तावित अभयारण्याच्या क्षेत्रात वसलेल्या समुदायांच्या (व्यक्तींच्या) अधिकारांचे स्वरूप व प्रमाण निश्चित करण्यासाठी राज्य शासन एका अधिकाऱ्याची नेमणूक करेल. सदर अधिकारी कलेक्टर म्हणून काम करेल. (कलम 18 B).

अधिकारांच्या पूर्ततेच्या प्रक्रियेत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

- प्रस्तावित अभयारण्याच्या क्षेत्रात असणाऱ्या जमिनीवर कोणत्याही व्यक्तीच्या अधिकारांची वैधता, स्वरूप व प्रमाण (कलम 19).
- वारसा व मृत्यूपत्राद्वारे मिळणारे अधिकार वगळता ही अधिसूचना जारी केल्यानंतर नमूद केलेल्या क्षेत्रात कोणतेही अधिकार मिळवता येणार नाहीत. (कलम 20).
- अधिसूचना जारी केल्यानंतर ६० दिवसांच्या आत कलेक्टर स्थानिक भाषेत परिपत्रक काढून ते अभयारण्याच्या लगतच्या प्रत्येक गावात, खेड्यात तसेच आसपासच्या परिसरात प्रसिद्ध करेल. त्या परिपत्रकात पुढील गोष्टींचा समावेश असेल (कलम 21) :

  १) अभयारण्याचे स्थान व सीमा.

  २) सदर परिपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत ज्या व्यक्तीला आपल्या अधिकाराचे दावे दाखल करायचे आहेत त्याने अधिकारांचे स्वरूप व प्रमाण, तसेच नुकसानभरपाईसाठी मागितलेली रक्कम याच्या लिखित तपशीलांसह कलेक्टरसमोर सादर करणे गरजेचे असल्याची सूचना.
- राज्य शासनाकडील नोंदीवरून कलेक्टर त्याच्यासमोर सादर करण्यात आलेल्या दाव्यांची तसेच त्याच्यासमोर दावा न केलेल्या परंतु कोणाही व्यक्तीच्या अस्तित्वात असणाऱ्या अधिकारांची चौकशी करेल (कलम 22).



यानंतर कलेक्टर दावे मंजूर वा नामंजूर केल्याचे आदेश जारी करेल. जर दावा मंजूर झाला तर (कलम 24) :

१) संबंधित जमीन प्रस्तावित अभयारण्याच्या हद्दीतून वगळेल.

२) भूसंपादन कायद्यानुसार १९८४ मिळणारी नुकसानभरपाई देऊन जी व्यक्ती जमीन संपादित करू देण्यास तयार असेल त्या व्यक्तीची जमीन-अधिकार संपादित केले जातील.

३) मुख्य वन्यजीव अधिकाऱ्याशी चर्चा करून काही हक्क कायम ठेवले जातील.

वरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अखेरीस अभयारण्याची घोषणा केली जाऊ शकेल. या कायद्याच्या सर्व नियम, ज्यामध्ये काही प्रकारच्या उद्योगांवर (कार्य) मर्यादा वा संपूर्ण बंदीचाही समावेश आहे, त्यानंतर लागू होतील.

पूर्तता प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बाधित व्यक्तींसाठी इंधन, चारा व अन्य वनोपजाची पर्यायी व्यवस्था राज्यशासन करेल (कलम 18A).

हा कायदा अधिकारांची पूर्तता करण्यापासून दोन प्रकारच्या संरक्षित क्षेत्रांना सवलत देतो : राखीव जंगल व किनाऱ्यालगतचा राष्ट्रीय मालकीचा समुद्रपट्टा. यापैकी राखीव जंगलाच्या बाबतीत असे गृहीत धरण्यात आले आहे की अधिकारांच्या पूर्ततेची वर उल्लेखलेली प्रक्रिया जंगल कायदा १९२७ नुसार पार पडली आहे. दुसऱ्या बाबतीत, स्थानिक मच्छिमारांची उपजीविकेची साधने तसेच कोणत्याही निरुपद्रवी जहाजाचा वहिवाटीचा अधिकार बाधित होणार नाही याची काळजी राज्य शासनाने घ्यायची आहे (कलम 26 A).

किनाऱ्यालगतचा राष्ट्रीय मालकीचा समुद्रपट्टा संरक्षित क्षेत्रात सामील करण्यापूर्वी राज्यशासनाने, केंद्र शासनाची मान्यता मिळवणे गरजेचे आहे. तसेच क्षेत्राच्या सीमा केंद्र शासनाच्या नौसेना विभागाच्या मुख्य जलसीमातज्ज्ञासोबत (चीफ हायड्रॉलॉजिस्ट) चर्चा करून निश्चित करायच्या आहेत (कलम 26 A).

कोणाही व्यक्तीला अभयारण्यात प्रवेश वा वास्तव्य करता येणार नाही. अपवाद,

१) कामावरील शासकीय कर्मचारी

२) मुख्य वन्यजीव अधिकाऱ्याने मान्यता दिलेली व्यक्ती

३) अभयारण्याच्या आत ज्याची स्थावर मालमत्ता आहे अशी व्यक्ती वा व्यक्तीचे आश्रित

४) अभयारण्यातून जाणाऱ्या महामार्गावरून जाणारी व्यक्ती (कलम 27).

तपास, वन्यजीवांचा अभ्यास, छायाचित्रण, शास्त्रीय संशोधन, पर्यटन वा अभयारण्यात राहणाऱ्या व्यक्तीसोबत व्यवहार करताना अभयारण्यात प्रवेश वा वास्तव्य करण्याची परवानगी मुख्य वन्यजीव अधिकारी देईल (कलम 28).

वरील परवानगी असल्याशिवाय कोणतीही व्यक्ती अभयारण्यामध्ये सशस्त्र प्रवेश करू शकत नाही (कलम 31).

वन्यजीवांना अपाय होईल अशा पद्धतीने कोणीही व्यक्ती अभयारण्यामध्ये रसायनांचा वापर, आग लावणे, विस्फोटकांचा व अन्य गोष्टींचा वापर करू शकत नाही (कलम 30, 32).

मुख्य वन्यजीव अधिकाऱ्याची मान्यता असल्याशिवाय कोणीही व्यक्ती, कोणतेही वनोपज वा वन्यजीव अभयारण्यातून हलवू वा नष्ट करू शकत नाही तसेच कोणत्याही वन्यजीवाच्या निवासस्थानाला इजा पोहचवू शकत नाही तसेच साठलेले वा वाहते पाणी अभयारण्याच्या आत वा बाहेर हलवू शकत नाही. असा परवाना द्यायचा असल्यास तो वन्यजीवांच्या अधिक योग्य व्यवस्थापनासाठी असल्याची खात्री राज्य शासनाने राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाबरोबर चर्चा करून करायची आहे. या कारणासाठी जर एखादे वनोपज अभयारण्यातून काढले गेल्यास ते केवळ स्थानिक समुदायांच्या खासगी वापरासाठीच जाईल. व्यावसायिक वापर करता येणार नाही (कलम 29). राज्य शासनाने प्रत्येक अभयारण्यासाठी एक सल्लागार समिती नेमायची आहे जी शासनाला अभयारण्याच्या अधिक चांगल्या व्यवस्थापन व संरक्षणाबाबत मार्गदर्शन करेल. या समितीमध्ये मुख्य वन्यजीव अधिकारी वा त्याने सूचित केलेला अधिकारी (वनरक्षक पदापर्यंतचा किमान), ज्यांच्या कार्यक्षेत्रात अभयारण्य येते त्या राज्य कायदेमंडळाचा एक प्रतिनिधी, पंचायती राज संस्थेचे तीन प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे दोन प्रतिनिधी, वन्यजीव संरक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत ३ व्यक्ती, गृह खाते व पशुवैद्यक खात्याचा प्रत्येकी १ प्रतिनिधी, मानद वन्यजीव अधिकारी तसेच अभयारण्याचा कारभार ज्याच्याकडे आहे असा अधिकारी सचिव सदस्य म्हणून असेल (कलम 33 B).

### राष्ट्रीय उद्याने

वन्यजीव संलग्न पर्यावरणाच्या संरक्षणासाठी वा वृद्धीसाठी राज्य शासन अभयारण्याच्या हद्दीत वा बाहेरचा कोणताही भाग 'राष्ट्रीय उद्यान' म्हणून घोषित करू शकते (कलम 35).



(समुदायांच्या) अधिकारपूर्तीसाठी अभयारण्याच्या बाबतीत आहेत तशाच प्रक्रिया पाळल्या जातील. मात्र कोणाचेही अधिकार कायम ठेवण्यास कलेक्टर मंजुरी देऊ शकणार नाही. सर्व अधिकार निश्चितपणे रद्द करावे लागतील [कलम 35(3)].

राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या सूचनेशिवाय राज्यशासन राष्ट्रीय उद्यानांच्या हद्दींच्या बाबतीत कोणतेही फेरफार करू शकणार नाही [कलम 35(5)].

राष्ट्रीय उद्यानांच्या हद्दीत चराईस बंदी राहील [कलम 35(7)]. अभयारण्यास लागू असणाऱ्या सर्व तरतूदी राष्ट्रीय उद्यानास देखील लागू असतील [कलम 35(8)].

### संरक्षित क्षेत्रे

स्थानिक समुदायांशी चर्चेनंतर राज्यशासन, शासनाच्या ताब्यातील कोणताही भाग, विशेषत: राष्ट्रीय उद्याने वा अभयारण्यांना लगतचा भाग, 'संरक्षित क्षेत्रे' (कॉन्झर्वेशन रिझर्व) म्हणून घोषित करू शकते (कलम 36 A). त्यानंतर मुख्य वन्यजीव अधिकाऱ्यास संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन व संरक्षण करण्याच्या कार्यात सल्ला देण्यासाठी म्हणून राज्य शासनाला 'संरक्षित क्षेत्र व्यवस्थापन समिती' गठीत करावी लागेल. सदर समितीत वनविभाग वा वन्यजीव खात्याचा एक प्रतिनिधी, ग्रामपंचायतीचा एक प्रतिनिधी (ज्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात संरक्षित क्षेत्र आहे), वन्यजीव संवर्धनाचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे तीन प्रतिनिधी व कृषि विभाग तसचे पशुपालन विभागाचा प्रत्येकी एक प्रतिनिधी असेल (कलम 36 B).

### समुदायाद्वारा संरक्षित क्षेत्रे

ज्या ठिकाणी समुदाय वा व्यक्ती स्वयंस्फूर्तीने वन्यजीव संरक्षण करू इच्छित असेल अशा खासगी अथवा सामुदायिक जमिनीला 'समुदायाद्वारे संरक्षित क्षेत्राचा' दर्जा राज्यशासन देऊ शकते.

समुदायाद्वारे संरक्षित क्षेत्र व्यवस्थापन समितीची (कम्युनिटी रिझर्व मॅनेजमेंट कमिटी) स्थापना संरक्षित क्षेत्राच्या व्यवस्थापन व संरक्षणासाठी राज्यशासन करू शकते. सदर समितीला व्यवस्थापनाच्या योजना आखण्याचे तसेच राबवण्याचे अधिकार असतील. सदर समितीमध्ये ग्रामपंचायतीने शिफारस केलेले पाच सदस्य असतील. जिथे ग्रामपंचायत नसेल तेथे ग्रामसभेने शिफारस केलेले सदस्य असतील तसेच समितीत ज्या वनविभागाच्या वा वन्यजीव खात्याच्या अधिकार क्षेत्रात संरक्षित क्षेत्र आहे त्या खात्याचाही एक प्रतिनिधी असेल (कलम 36 D).

समुदायाद्वारे संरक्षित क्षेत्राअंतर्गत असणाऱ्या जमिनीच्या वापराच्या प्रकारात व्यवस्थापन समितीने निर्णय घेऊन राज्य शासनाची मान्यता मिळवल्याखेरीज कोणताही बदल करता येणार नाही (कलम 36 C).

## ६. पर्यटनावर हा कायदा कशाप्रकारे नियंत्रण ठेवतो?

मुख्य वन्यजीव अधिकारी (सी.डब्ल्यू.एल.डब्ल्यू.) अभयारण्यात प्रवेश वा वास्तव्याचा परवाना देऊ शकतात (कलम 28). राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची परवानगी असल्याशिवाय व्यापारी कारणासाठी कोणत्याही पर्यटक निवास, हॉटेल, प्राणीसंग्रहालयाचे बांधकाम अभयारण्याच्या वा राष्ट्रीय उद्यानाच्या सीमाक्षेत्रात करता येणार नाही (कलम 33). वन्यजीव संरक्षणासाठी उपयुक्त ठरेल अशा कोणत्याही प्रकारे मुख्य वन्यजीव अधिकारी पर्यटनावर नियंत्रण ठेवू शकतात.

## ७. वन्यप्राणी वा वन्य प्राणीजन्य वस्तूंचा व्यापार हा कायदा कशाप्रकारे नियंत्रित करतो?

या कायद्याचे उल्लंघन करून मारलेला, (उपद्रवकारक प्राणी वगळता) कोणताही वन्यप्राणी वा या कायद्याचे उल्लंघन करून ठेवलेली कोणतीही प्राणीजन्य वस्तू वा शिकार (ट्रॉफी) वा या कायद्याचे उल्लंघन करून आयात केलेला हस्तीदंत अथवा हस्तीदंतापासून बनवलेली वस्तू ही राज्य सरकारच्या ताब्यात जमा होईल. वरील उल्लंघन जर केंद्र शासनाने घोषित केलेल्या अभयारण्यात वा राष्ट्रीय उद्यानात झाले असल्यास मारलेले जनावर/वस्तू वा संबंधित शिकार केंद्र सरकारच्या ताब्यात जाईल (कलम 39).

परिशिष्ट १ वा परिशिष्ट २ च्या भाग २ मध्ये नमूद केलेला कोणताही प्राणी वा प्राणीजन्य वस्तू तसेच शिकार (ट्रॉफी) तसेच कस्तुरी किंवा गेंड्याचे शिंग ज्याच्या ताब्यात असेल अशा व्यक्तीने तशी माहिती मुख्य वन्यजीव अधिकाऱ्याला देणे वा सदर प्राणी/वस्तू वन्यजीव अधिकाऱ्याला लेखी पूर्वपरवानगी नंतरच हस्तांतरीत करणे वा विकणे गरजेचे आहे (कलम 40).

अशी वस्तू/प्राणी ताब्यात असण्यासाठी मालकीचा परवाना असणे आवश्यक आहे (कलम 42).



कोणत्याही प्राणीजन्य वस्तूंच्या (मोराची पिसे वगळता) व्यापारासाठी परवाना असणे गरजेचे आहे (कलम 44). परिशिष्ट १ व परिशिष्ट २, भाग २ मध्ये नमूद प्राण्यांच्या बाबतीत असा कोणताही व्यापार करण्याची परवानगी नाही (कलम 48).

## ८. गुन्ह्यांच्या प्रतिबंधासाठी व अवरोधासाठी काय तरतूदी आहेत?

या कायद्याचे उल्लंघन केले आहे असा सबळ पुरावा ज्या व्यक्तीविरुद्ध आहे अशा व्यक्तीच्या ताब्यातील प्राणी वा वनस्पतींची पाहणी करणे, वाहने/जहाजे थांबवून तपासणी करणे वा अशा व्यक्तीविरुद्ध तपास वॉरंट काढण्याचे अधिकार कोणत्याही मान्यताप्राप्त अधिकाऱ्यास आहेत (कलम 50). संरक्षित क्षेत्रात अनवधानाने प्रवेश केलेल्या मच्छिमारांना यातून सूट आहे.

या कायद्याच्या उल्लंघनासाठी सात वर्षांपर्यंत कारावास किंवा/आणि रु. २५,००० पर्यंत दंडाची तरतूद आहे (कलम 51). कंपनीकडून गुन्हा घडला असल्यास गुन्हा घडताना कंपनी व्यवहारासाठी जबाबदार व्यक्ती, तसेच कंपनी, हे सर्व गुन्ह्यांसाठी जबाबदार असतील (कलम 58).

गुन्ह्याची माहिती पुरवणाऱ्यांना रु. १०,००० पर्यंतचे इनाम देण्याचे अधिकार राज्य सरकार मुख्य वन्य जीव अधिकाऱ्यांना देऊ शकते (कलम 60 B).

## ९. संरक्षित व्याघ्र क्षेत्रांसाठी कोणत्या विशेष तरतुदी आहेत?

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन अधिकारमंडळा (NTCA)ची स्थापना वन्यजीव संरक्षण कायद्या-मधील २००६ च्या सुधारणेनंतर झाली आहे. पर्यावरण व वन मंत्री अध्यक्षस्थानी असलेल्या या अधिकारमंडळाची स्थापना केंद्रशासन करेल (कलम 38L).

NTCA ची कार्ये व अधिकार पुढीलप्रमाणे आहेत (कलम 38 O):

- राज्य शासनाने व्याघ्र संवर्धनाचे केलेले नियोजन आराखडे मंजूर करणे.
- व्याघ्र संरक्षित क्षेत्रांत जैवसृष्टीला मारक पद्धतीने होणारा जमिनीचा वापर थांबवणे.
- मनुष्य व वन्यप्राण्यांमधील संघर्ष थांबवण्यासाठी उपाययोजना करणे तसेच वनक्षेत्रात व व्याघ्र संरक्षित क्षेत्रात दोहोंच्या परस्परांना हानी न पोहोचवता सहवासावर भर देणे.

- संरक्षणासाठीची माहिती, भावी काळातील संरक्षित व्याघ्र क्षेत्रामध्ये संरक्षणाबाबतचे नियोजन इत्यादी पुरवणे.
- वाघ व त्याचा अधिवास यावर संशोधन करणे.
- व्याघ्र संरक्षित क्षेत्रे तसेच दोन संरक्षित क्षेत्रांना जोडणारे भाग हे सार्वजनिक हिताव्यतिरिक्त अन्य कोणत्याही पर्यावरणमारक कामांसाठी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मंजूरीशिवाय वापरले जाणार नाहीत हे पाहणे.

व्याघ्र संवर्धन अधिकारमंडळ वाघांच्या आणि संरक्षित क्षेत्रांच्या संरक्षणाच्या सूचना देऊ शकते, मात्र या सूचनांचा स्थानिक समुदायांच्या विशेषत: अनुसूचित जमातींच्या अधिकारांवर दुष्परिणाम होणार नाही हे पाहणे आवश्यक आहे [कलम 38 O(2)].

प्रत्येक राज्य मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली व्याघ्र संवर्धन सुकाणू समिती स्थापन करेल (कलम 38U) सोबतच प्रत्येक राज्य व्याघ्र संवर्धन संस्थादेखील व्याघ्र संवर्धनासाठी स्थापन करेल (कलम 38 X).

व्याघ्र संवर्धन अधिकारमंडळाच्या सूचनेवरुन राज्य सरकार एखादा विभाग व्याघ्र संरक्षित क्षेत्र म्हणून जाहिर करू शकेल, ज्यासाठी शासनाला व्याघ्र संवर्धन आराखडा तयार करावा लागेल. या आराखड्यामध्ये वाघ असणाऱ्या जंगलात वा संरक्षित क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तींचे शेतीचे, विकासाचे व उपजीविकेचे अधिकार सुरक्षित राहतील हे पहावे लागेल (कलम 38 V).

व्याघ्र संरक्षित क्षेत्रातील अनुसूचित जमातींचे व अन्य जंगलवासींचे परस्परांना मान्य अशा शर्तींवर पुनर्वसन वा अधिकारांवर मर्यादा आणता येतील मात्र यासाठी काटेकोर शर्तींचे पालन करावे लागेल. या शर्ती पुढीलप्रमाणे [कलम 38 V (5)]:

१) अधिकारांची छाननी व निश्चिती झालेली असावी.

२) संरक्षित क्षेत्रांत राहणाऱ्या अनुसूचित जमातींच्या व इतर जंगलवासींच्या काही कामांमुळे वाघ व त्यांचा अधिवास यांना कायमस्वरुपी इजा पोहोचते हे नक्की झालेले असावे.

३) परस्पर पूरक सहवासाचे इतर पर्याय उपलब्ध नाहीत हे सिद्ध झालेले असावे.

४) पुनर्वसनाचे लाभ हे राष्ट्रीय पुनर्वसन धोरणाच्या नियमांनुसार तसेच बाधित व्यक्ती व ग्रामसभेच्या मंजुरीनंतर निश्चित केलेले असावेत.

याशिवाय हा कायदा असेही सूचित करतो की पुनर्वसन वसाहत व जमीन अनुसूचित जमाती व अन्य जंगलवासींना उपलब्ध होईपर्यंत त्यांचे अधिकार अबाधित रहावेत



[कलम 38 V (5)]. सार्वजनिक हितासाठी व्याघ्र संवर्धन अधिकारमंडळ व राष्ट्रीय वनजीव मंडळाच्या परवानगीनंतरच एखाद्या व्याघ्र संरक्षित क्षेत्राचा दर्जा काढून घेतला जाऊ शकतो. अन्य कोणत्याही कारणांसाठी हा दर्जा राज्यशासन काढून घेऊ शकत नाही (कलम 38 W).

**प्रत्येक प्रकारच्या संरक्षित क्षेत्रासाठी लागू होणाऱ्या कायद्याच्या तरतुदींची तुलना**

| तरतूद | अभयारण्य | राष्ट्रीय उद्यान | संरक्षित क्षेत्र | समुदायाद्वारे संरक्षित क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| अधिकारांची पूर्तता | पुनर्वसन अधिकारीदावे मंजूर वा नामंजूर करू शकतो, नुकसान भरपाईची रक्कम ठरवू शकतो, हद्दीमध्ये फेरफार सुचवू शकतो. काही अधिकार मुख्य वन्यजीव अधिकाऱ्यांशी चर्चेनंतर कायम ठेवू शकतो. | अभयारण्याप्रमाणेच मात्र अधिकार कायम राहू शकत नाहीत. | उल्लेख नाही. | उल्लेख नाही. मात्र बहुधा समुदायाच्या निर्णयावर अवलंबून. कारण व्यवस्थापन आणि अन्य निर्णयाचे अधिकार समुदायाकडे आहेत. |
| कोणताही वन्यजीव वा वनोपजाला इजा पोहोचवणे, नष्ट करणे किंवा वन्यजीव अधिवासाला हानी पोहोचवणे वा जलस्रोत वळवणे यावर बंदी | लागू | लागू | उल्लेख नाही | उल्लेख नाही बहुधा समुदायाच्या निर्णयावर अवलंबून |
| प्रवेशावर बंधन | काही विशेष अपवाद वगळता मुख्य वन्यजीव अधिकाऱ्याची परवानगी आवश्यक | अभयारण्याप्रमाणेच | उल्लेख नाही | उल्लेख नाही बहुधा समुदायाच्या निर्णयावर अवलंबून |
| परवाना | वरीलप्रमाणेच | अभयारण्याप्रमाणेच | उल्लेख नाही | उल्लेख नाही बहुधा समुदायाच्या निर्णयावर अवलंबून |
| सीमांमध्ये बदल | राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या सूचनेनंतर राज्यसरकार करू शकते. | अभयारण्याप्रमाणेच | उल्लेख नाही | उल्लेख नाही |

| तरतूद | अभयारण्य | राष्ट्रीय उद्यान | संरक्षित क्षेत्र | समुदायाद्वारे संरक्षित क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| आग लावण्यावर बंदी | लागू | लागू | लागू | लागू |
| घातक वस्तूंच्या वापरावर प्रतिबंध | लागू | लागू | लागू | लागू |
| सशस्त्र प्रवेशावर बंदी | लागू | लागू | उल्लेख नाही | उल्लेख नाही बहुधा समुदायाच्या निर्णयावर अवलंबून |
| व्यावसायिक पर्यटन निवास, हॉटेल्स्, प्राणीसंग्रहालये, सफारी यांची निर्मिती राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या परवानगीनंतर | लागू | लागू | उल्लेख नाही | उल्लेख नाही बहुधा समुदायाच्या निर्णयावर अवलंबून |
| पाळीव प्राण्यांना चरवणे | उल्लेख नाही | लागू | उल्लेख नाही | उल्लेख नाही बहुधा समुदायाच्या निर्णयावर अवलंबून |
| पाळीव प्राण्यांना संसर्गजन्य आजारावरील प्रतिबंधक लस देणे. (संरक्षित क्षेत्रापासून ५ कि.मी. अंतरात) | लागू | लागू | उल्लेख नाही | उल्लेख नाही बहुधा समुदायाच्या निर्णयावर अवलंबून |
| व्यवस्थापन व नियोजनाचे निर्णय | वन खाते | वन खाते | संरक्षित क्षेत्र व्यवस्थापन समिती | समुदायाद्वारे संरक्षित क्षेत्र व्यवस्थापन समिती |

**वन्यजीव (संरक्षण) कायदा १९७२**
**(२००३ आणि २००६ च्या सुधारणा कायद्यांसह)**
**प्रकाशक** : 'कल्पवृक्ष' फ्लॅट नं ५, श्री दत्त कृपा,
९०८ डेक्कन जिमखाना, पुणे - ४११००४.
**फोन** : ९१-२०-२५६७५४५०
**फॅक्स** : ९१-२०-२५६५४२३९
**ईमेल** : kvoutreach@gmail.com
**वेबसाईट** : www.kalpavriksh.org
**डिझाईन** : मधुवंती अनंतराजन
**अनुवाद/भाषांतर** : रोहन जोशी
**निधी** : मिझेरिऑर, आखेन, जर्मनी